# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ५७३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:–०८/०९/२०१६

**१) संगनमत करुन भांडण व मारहान केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०२/०९/२०१६ रोजी ०९.०० वा. दर. यातील फिर्यादी हा गावातील मुख्य चौकात बसला असतांना यातील आरोपी हे फिर्यादीला पाहुण त्याचे काकुला शिवीगाळ करीत असतांनी फिर्यादीने हटकले असता आरोपीतांनी संगनमत, भांडण करुन आरोपी क्र. १ ने फिर्यादीला १ थापड मारुन विचात बोलायचे नाही व आरोपी क्र. २ ने सर्व गभणे परीवाराला अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन धमकी दिली असे फिर्यादी गणेश नरेश गभणे वय ३७ वर्ष, रा. सावरी/मुरमाडी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २९४,५०४,५०६,३४ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. टेंभुर्णे पो. स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**२) अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०७/०९/२०१६ रोजी १९.१५ वा. दर. यातील फिर्यादी ही आपल्या घरी हजर असतांनी यातील आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीचे घरासमोर सार्वजनीक रोडवर येवुन फिर्यादीच्या पतीला उद्देशुन आरोपी क. १ ते ३ यांनी 'केव्हाचा पोलीस पाटील झाला' असे अश्लिल शब्दात शिवीगाळ दिली असे बोलले असता फिर्यादीने आरोपीताला हटकले आणि फिर्यादी सोबत भांडण करुन जिवाने मारण्याची व पिटण्याची धमकी दिल्याने फिर्यादी सौ. एकता चंद्रशेखर चु–हे वय ३८ वर्ष, रा. सावरी/मुरमाडी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २९४,५०६,३४ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. टेंभुर्णे पो. स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**३) गळफास लावुन वृध्दांचा मृत्यु . :–**

दिनांक ०७/०९/२०१६ रोजी ०६.३० वा. पुर्वी. यातील मृतक चंदनसिंग हिरासिंग बैस वय ८० वर्ष, रा. नेहरु वार्ड वरठी यांचा मुलगा रामसिंग बैस याने फिर्यादीस फोनव्दारे माहीती दिली की माझ्या वडीलांनी घरासमोरील अंगणातील लिंबुच्या झाडाला नायलन दोरीने गळफास लावुन मरण पावलेला आहे. या माहीती वरुन फिर्यादी संजय महादेव मिरासे वय ४२ वर्ष, रा. शास्त्री वार्ड वरठी यांचे तोंडी रिपोर्ट दिल्याने असे पोलीस स्टेशन वरठी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. पटले पो. स्टे. वरठी हे करीत आहेत.

**३) विषप्राशन करुन महीलेचा मृत्यु . :–**

दिनांक ०७/०९/२०१६ रोजी ०२. ४५ वा. दर. यातील मृतक वैशाली अनिल बोरकर वय ३४ वर्ष, रा. मुंडीपार सडक हीने स्वत:च्या घरी विष प्राशन केल्याने तीला औषधेपचारा करीता उपजिल्हा रुग्णालय साकोली येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमो वरुन पो. स्टे. साकोली येथे मर्ग क्र. ००/१६ क. १७४ जाफौचे कागदपत्र पो. स्टे. ला प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना राऊत पोस्टे लाखनी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नंबरी नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. रामटेके पो. स्टे. लाखनी हे करीत आहेत.

४) <u>मोटार वाहन कायद्याखाली कारवाई.</u> :-

दिनांक ०७/०९/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली ९६ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी तिन सिटर वाहनांवरती ०७ केसेस, अवैध प्रवासी ०३ केसेस तसेच ईतर वाहनांवरती ९६ केसेस करण्यात आलेल्या आहेत

(के.एच.धात्रक)
**प्रभारी पोलीस उपअधिक्षक**(गृह)
भंडारा.
**दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.